| MHAH180021232024 | केस दाखल दिनांक | १४/०८/२०२४ |
|---|---|---|
| | केस नोंदणी दिनांक | १९/०८/२०२४ |
| | केस निकाल दिनांक | ०६/०१/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०१ ०४ २३ |

भाग – अ

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.३, राहुरी यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – आदित्य कृ. शिंदे)**

न्यायनिर्णय घोषीत दि. ०६/०१/२०२६

**(नियमित फौजदारी खटला क्र. ५०२/२०२४)** **निशाणी क्र. ३३**

गुन्हा नोंद क्र. I ५९४/२०२४, राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी

| | | | |
|---|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | : | | **महाराष्ट्र शासन** मार्फत<br>ठाणे अंमलदार, राहुरी पोलीस स्टेशन,<br>ता. राहुरी, जिल्हा –अहमदनगर |
| अभियोग पक्षातर्फे | : | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. गांधले |
| आरोपी | : | १. | **सतिष बापु लोखंडे,**<br>वय–३२ वर्षे, धंदा– मजुरी. |
| | | २. | **गोरख तात्या लोखंडे,**<br>वय – ४० वर्षे, धंदा – मजुरी. |
| | | ३. | **महेंद्र छबु लोखंडे,**<br>वय – १९ वर्षे, धंदा – मजुरी. |
| | | ४. | **संदिप बापु लोखंडे,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – मजुरी. |
| | | ५. | **सालच्या विष्णु लोखंडे,**<br>वय – २६ वर्षे, धंदा – मजुरी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६. | **छबु तात्या लोखंडे,**<br>वय – ५० वर्षे, धंदा – मजुरी,<br>सर्व रा. स्टेशन रोड, तांदुळवाडी, ता. राहुरी, जि. अहमदनगर. |
| आरोपी क्र. १ ते ६ तर्फे विधीज्ञ | : | | **अॅड. श्री. एम. बी. पेरणे** |

भाग – ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १८/०५/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १९/०५/२०२४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | १४/०८/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २८/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २८/०७/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | ०६/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०६/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सतिष बापु लोखंडे** | -- | -- | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, १४३,१४७, ५०४ ,५०६ सह कलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | |
| २. | **गोरख तात्या लोखंडे** | ''-'' | ''-'' | ''-'' | ''-'' | -- | |
| ३. | **महेंद्र छबु लोखंडे** | ''-'' | ''-'' | ''-'' | ''-'' | -- | |
| ४. | **संदिप बापु लोखंडे** | ''-'' | ''-'' | ''-'' | ''-'' | -- | |
| ५. | **सालच्या विष्णु लोखंडे** | ''-'' | ''-'' | ''-'' | ''-'' | -- | |
| ६. | **छबु तात्या लोखंडे** | ''-'' | ''-'' | ''-'' | ''-'' | -- | |

## न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक – ०६/०१/२०२६)

१) प्रस्तुत खटला आरोपींविरूद्ध भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये उल्लंघन करुन पात्र गुन्हयाच्या शिक्षेसाठी संपरिक्षेस सामोरे जात आहेत.

२) **<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,</u>**

दि. १८/०५/२०२४ रोजी रात्री ०९.३० वाजताचे सुमारास फिर्यादी सुभाष हे निलेश तनपुरे याचे गावठाण, स्टेशन रोडमधील वीटभट्टीवर असताना त्यांना त्यांचा मुलगा मंगेश याचा फोन आला व म्हणाला की, मी व आजी भिकुबाई आम्ही आपल्या घरासमोर असताना आम्हा दोघांना आरोपी क्र. १ ते ६ यांनी शिवीगाळ करून तुम्ही आमच्या नादी लागता का, दोन तीन दिवसापुर्वी आमच्या सोबत भांडण करून प्रतिष्ठीत लोकांना बोलावुन मिवुन घ्यायला लावले असे म्हणून मला व आजीला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्र. २ गोरख याने त्याचे हातातील काठीने पाठीला व हाताला मारहाण केली आणि आमच्या नादी लागले तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही असा दम दिला. म्हणुन, फिर्यादीने आरोपींविरोधात प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३) वरीलप्रमाणे फिर्याद प्राप्त होताच राहुरी पोलीस स्टेशनला गु.र.नं. I–५९४/२०२४, भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ व ५०६ सह कलम १४९ चे उल्लंघन करुन गुन्हा नोंदविला गेला. सदर गुन्हयाचा तपास हा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. टी. बी. गिते यांनी केलेला आहे. त्यांनी त्यांच्या तपासामध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला, गुन्हयातील मुद्देमाल जप्त करुन तशी मुद्देमाल पावती तयार केली, आरोपीस समजपत्र दिले व तपास पुर्ण होताच आरोपींविरोधात वरील कलमान्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपींविरुध्द नि. क्र. १७ अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ व ५०६ सह कलम १४९ चे उल्लंघन करुन पात्र गुन्हयाच्या शिक्षेसाठी दोषारोप ठेवले व त्यातील मजकूर हा आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता सदरचा गुन्हा त्यांनी मान्य व कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. प्रस्तुत आरोपींविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता,

१९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५) प्रस्तुत खटल्यासाठी सहाय्यक अभियोक्ता व आरोपींतर्फे विधीज्ञ यांचे युक्तीवाद ऐकले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले व त्यावरील निष्कर्ष हे मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, दि. १८/०५/२०२४ रोजी रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास स्टेशन रोड, म्हसे वस्ती, तांदुळवाडी, ता. राहुरी येथे आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुनःस्मरणार्थ फिर्यादीचा मुलगा मंगेश व आई भिकुबाई हे त्यांचे घरासमोर असताना आरोपींनी त्यांना लाकडी काठीने मारहान करून इच्छापूर्वक दुखापत केली, म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधान कलम ३२४ सह कलम १४९** अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुनःस्मरणार्थ फिर्यादीचा मुलगा मंगेश व आई भिकुबाई यांना लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक साधी दुखापत केली, म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधान कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी समान उद्दिष्टे गाठण्यासाठी जमविली, म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान कलम १४३ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुनःस्मरणार्थ दंगा केला, म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान कलम १४७ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्यांच्या समान उद्देशाच्या पुनःस्मरणार्थ फिर्यादीचा मुलगा मंगेश व आई भिकुबाई यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ केली म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | नाही. |
| ६. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीचा मुलगा मंगेश व आई भिकुबाई यांना दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला म्हणुन आरोपींनी **भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये** शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| ७. | काय आदेश? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ६ साठी –</u>

६) मुद्दे क्र. १ ते ६ हे एकमेकांशी संबंधीत आहेत. त्यामुळे, वरील सर्व मुद्दयांवरील पुराव्यातील तीच ती चर्चा टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ६ ची कारणमिमांसा मी एकत्रीत नोंदवित आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सुभाष रामदास जगताप, साक्षीदार क्र. २ मंगेश सुभाष जगताप आणि साक्षीदार क्र. ३ भिकुबाई रामदास जगताप यांची साक्ष अनुक्रमे नि. क्र. २९, ३० व ३१ वर नोंदविण्यात आलेली आहे. साक्षीदार क्र. १ सुभाष हे फिर्यादी आहेत. साक्षीदार क्र. २ मंगेश हा फिर्यादीचा मुलगा आहे आणि साक्षीदार क्र. ३ भिकुबाई ही फिर्यादीची आई आहे. साक्षीदार क्र. १ सुभाष यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, आरोपी हे त्यांचे शेजारी राहात असल्याकारणाने ते त्यांना ओळखतात. त्यांच्यामध्ये कोणतीही घटना झाली नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. परंतु, त्यांच्यामध्ये किरकोळ वाद झाले असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. आरोपींनी जुन्या भांडणाच्या कारणावरून त्यांची आई भिकुबाई व मुलगा मंगेश यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. आरोपी क्र. २ गोरख याने त्याचे हातातील लाकडी काठीने मुलगा मंगेश याच्या पाठीवर व हातावर मारहाण केली नसल्याचे देखील त्यांनी कथन केले आहे. तसेच, आरोपींनी त्यांना तुम्ही आमच्या नादी लागले, तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली नसल्याचे सांगितले. सदरील फिर्यादी साक्षीदाराने फिर्याद वरील केवळ त्यांची सही (नि.पी.१) ही ओळखली. परंतु, फिर्यादमधील मजकुर हा त्यांच्या सांगण्याप्रमाणे नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

७) तसेच, साक्षीदार क्र. २ व ३ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, सर्व आरोपी हे त्यांचे शेजारी राहात असल्याकारणाने ते त्यांना ओळखतात. तसेच, कोणतीही घटना घडली नसल्याचे व पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

८) साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने विद्वान सरकारी वकीलांनी त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उलटतपाससदृश सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्ये देखील आरोपींविरूद्ध कुठलाही पुरावा आला नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सुभाष यांना फिर्यादीतील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविण्यात आला. परंतु, तो त्यांनी पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले आहे. साक्षीदारांनी त्यांच्या व आरोपींच्या दरम्यान न्यायालयासमोर तडजोड झाली असल्याचे सांगितले. तसेच, आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे देखील त्यांनी सांगितले.

९) फिर्यादी यांनी न्यायालयात नि.क्र. २८ च्या पुरशिसद्वारे कळविले की, त्यांनी आपआपसात तडजोड केली आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० (१) व (२) मध्ये आपसात तडजोड न करता येण्यासारखे असल्याने फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. न्यायालयाबाहेर आपआपसात त्यांनी तडजोड केल्याचे दिसते. त्यांच्या मधील क्लेश वाढु नये व त्यांच्या दरम्यान शांतता राहावी या उद्देशाने दोन्ही पक्षांनी तडजोड केल्याचे दिसते.

१०) फिर्यादीने त्यांच्यामध्ये व आरोपींदरम्यान सदरचे प्रकरण आपसात मिटले असल्याचे व ते पुढे चालविणेचे नसल्याचे त्यांचे एकुण पुराव्याच्या अवलोकनार्थ समजते. अभिलेखावर आलेल्या एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यानचा वाद मिटलेला दिसुन येतो. फिर्यादीच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. अभियोग पक्षाच्या संपुर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींच्या विव्दान वकीलांचे युक्तीवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सबळ पुराव्याविना सिध्द होत नसल्याचे दिसुन येते. वर नमुद मुद्दे सिध्द करण्यासाठी कुठलाही पुरावा उपलब्ध नाही.

सबब, मुद्दे क्र. १ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ साठी–</u>**

**११)** मुद्दे क्र. १ ते ६ साठी नोंदविलेली कारणमिमांसा विचारात घेता अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हयाचे घटक सिध्द केले नसल्याने सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. मी मुद्दे क्र. १ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत. आरोपींविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपींची वर नमुद गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. प्रस्तुत खटल्यात एक लाकडी काठी सुमारे ३ फुट लांबीची जप्त करण्यात आली आहे. परंतु, सदरचा मुद्देमाल हा मुल्यहीन असल्याने त्याचा अपील कालावधीनंतर नाश करणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ नुसार यथोचित राहील. सबब, मुद्दे क्र. १ ते ६ च्या निष्कर्षान्वये तसेच, मुद्दा क्र. ७ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ ते ६ यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, १४३, १४७, ५०४ व ५०६ सह कलम १४९ चे पात्र शिक्षेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्र हे रद्द करण्यात येत असून आरोपींना मुक्त करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमाल- एक लाकडी काठी सुमारे ३ फुट लांबीची ही मुल्यहीन असुन त्याचा अपील कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| ४. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणे करीता आरोपी क्र. १ ते ६ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार रुपये १५,०००/- चे प्रत्येकी वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र दयावयाचे आहे. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
ADITYA KRISHNA SHINDE
2026.01.09 17:27:42 +0530

दिनांक – ०६/०१/२०२६ **(आदित्य कृ. शिंदे)**

राहुरी. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

न्यायालय क्र. ३, राहुरी.

भाग क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| **सा.क्र.** | **साक्षीदारांचे नाव** | **स्वरुप** | **निशाणी** |
|---|---|---|---|
| १. | सुभाष रामदास जगताप | फिर्यादी | २९ |
| २. | मंगेश सुभाष जगताप | साक्षीदार | ३० |
| ३. | भिकुबाई रामदास जगताप | साक्षीदार | ३१ |

(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक

(क) न्यायालयातर्फे साक्षीदार : निरंक

## <u>फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांक</u>

### (अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि. पी–१ | फिर्यादीमधील केवळ फिर्यादीची सही |

(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी : निरंक.

(क) न्यायालयातर्फे निशाणी : निरंक.

(ड) महत्वपुर्ण वस्तु : निरंक.

ADITYA
KRISHNA
SHINDE
2026.01.09
17:27:21
+0530

दिनांक – ०६/०१/२०२६

राहुरी.

**(आदित्य कृ. शिंदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

(न्यायालय क्र. ३), राहुरी.